शामुको– ऑर्डि. (जे) क्यूबी ३८४–२७,५००–६·७१

# नमुना क्रमांक २९

## लेखापरीक्षा अहवाल (सहकारी उत्पादक संस्था)

## विभाग दुसरा

१. भाग–भांडवल :—

१) शासनाने घेतलेल्या विमोचनयोग्य अधिमान भागांची प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत काय ?

२) शासकीय भाग भांडवलाचा योग्य रीतीने हिशेब ठेवला आहे काय ? भाग भांडवल देताना घालण्यात आलेल्या सर्व अटींचे आणि शर्तींचे अनुपालन संस्थेने पूर्णपणे केले आहे काय ? शासनाला देय असलेल्या लाभांशाच्या रकमेचा जमाखर्च करून ती देण्यात आली आहे काय ?

३) शासकीय भाग भांडवलाच्या परतीसाठी संस्थेने भांडवल विमोचन निधी निर्माण केला आहे काय ? तो योग्य प्रकारे गुंतविला आहे काय ?

४) अ) संस्थेच्या पोटनियमानुसार मजुरीतून भाग भांडवलासाठी वर्गण्या कापल्या जातात काय ?

ब) अशा भाग वर्गण्यांचा दर काय आहे ?

२. सभासदत्व :—

१) अ) उत्पादक सभासद.

ब) अनुत्पादक सभासद यांची एकूण संख्या लिहा.

२) अनुत्पादक सभासदांना व्यवस्थापन समितीवर / संचालक मंडळावर प्रतिनिधीत्व आहे काय ? असल्यास, त्यांची संख्या लिहा.

३. ठेवी :—

पोटनियमातील तरतूदीप्रमाणे ठेवी स्वीकारण्यात येतात काय ? ठेवी स्वीकारण्याबाबत काही नियम तयार केले आहेत काय ? त्यांचे अनुपालन होत आहे काय ?

४. बाहेरील कर्जे :—

१). विविध कारणांसाठी संस्थेने घेतलेल्या कर्जाच्या आणि पत मर्यादांच्या रकमा काय आहेत ?

| माध्यमाचे नाव<br>१ | कर्ज वा पत मर्यादेचा प्रकार<br>२ | कारण<br>३ | मंजूर रक्कम<br>४ |
|---|---|---|---|
| | | | |

| उचललेली कमाल रक्कम<br>५ | परतफेड केलेली रक्कम<br>६ | येणे रक्कम<br>७ | थकलेली रक्कम<br>८ |
|---|---|---|---|
| | | | |

२) विविध कर्जाचे व पत मर्यादांचे व्यवहार समाधानकारक आहेत काय ?

३) परतफेडी वक्तशीर आहेत काय ?

४) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि अन्य माध्यमाकडून संस्थेने घेतलेली कर्जे आणि पत मर्यादा याबद्दलच्या विविध अटींचे व शर्तींचे अनुपालन झाले आहे काय ?

## ५. शासन आणि अन्य माध्यमाकडील आर्थिक सहाय:—

१) शासन आणि अन्य माध्यमे यांच्याकडून मिळालेले विविध प्रकारचे आर्थिक सहाय लिहा.

२) अशी सहाये देताना घालून दिलेल्या विविध अटींचे अनुपालन होते काय ?

३) शासन आणि अन्य माध्यमे यांनी पुरविलेली अवजारे आणि सामुग्री चांगल्या स्थितीत ठेवली आहेत काय ? लेखापरीक्षेचे वेळी त्यांची पडताळणी करा.

## ६. उत्पादन आणि व्यवहार :—

१) आपले उत्पादन आणि अन्य कामे व्यवस्थित चालण्यासाठी संस्थेने काही नियम तयार केले आहेत काय ?

२) उत्पादनासाठी कोणता वेगवेगळा कच्चा माल लागतो तो आणि वर्षात खरेदी केलेल्या अशा मालाची किमत लिहा.

३) स्थानिक बाजार पेठेत माल खरेदी केली असल्यास शिखर वा प्रादेशिक संस्थाकडून ना हरकत प्रमाणपत्रे संस्थेने मिळविली आहेत काय ते लिहा.

४) अ) उत्पादक सभासदांना पुरविलेल्या कच्च्या मालाच्या आणि अन्य गरजांच्या व्यक्तिगत पत मर्यादा काय आहेत ?

ब) पोटनियमानुसार त्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून ठरविल्या गेल्या आहेत काय ?

क) लेखापरीक्षेच्या दिनांकास अशा येणे कर्जाची एकूण बाकी किती आहे ?

ड) संशयित आणि बुडीत कर्जांची एकूण रक्कम वेगवेगळी लिहा.

५) असा कच्चा माल कर्जाऊ देताना कर्जरोखे करून घेतले आहेत काय ? अशा रोख्यांवर जामीनदारांच्या सह्या घेतल्या आहेत काय ?

६) अ) ज्यासाठी कच्चा माल देण्यात आला आहे असा पक्का माल विक्रीसाठी सोसायटीकडे आणण्यासाठी काही कालमर्यादा ठरविली आहे काय ?

ब) तिचे काटेकोरपणे अनुपालन होते काय ?

क) नसल्यास, अशा सभासदांविरूद्ध कोणती कारवाई केली आहे ?

ड) संस्थेने कच्च्या मालाचा पुरवठा केला आहे पण सभासदांनी पक्का माल विक्रीसाठी संस्थेकडे पाठविला नाही अशी काही उदाहरणे आहेत काय ? अशा सभासदांची संख्या आणि त्यात गुंतलेली रक्कम लिहा.

इ) अशा कर्जाच्या वसुलीसाठी काय कारवाई करण्यात येत आहे ते लिहा.

७) उत्पादन आणि कच्चा माल यांच्या संबंधित नोंदवह्या योग्य रीतीने ठेवण्यात आल्या आहेत काय ? त्या अद्यावत लिहिल्या आहेत काय ?

८) प्रत्येक सभासदासाठी उत्पादनाच्या वैयक्तिक हिशेबाच्या खातेवह्या ठेवल्या आहेत काय ?

९) पक्क्या मालाच्या आवक व जावक नोंदवह्या योग्यप्रकारे ठेवल्या आहेत काय ?

१०) पक्क्या मालाची एकूण आवक आणि जावक शिल्लक मालाच्या नोंदवहीत आणि सभासदांच्या वैयक्तिक खात्यात योग्यप्रकारे खतविली आहे काय ?

११) कच्च्या मालाची खरेदी आणि पक्क्या मालाच्या किंमती ठरविणे यावर पुरेसे नियंत्रण आहे काय ?

१२) खात्याने सम्मत केलेल्या उत्पादन कार्यक्रमानुसार उत्पादन कार्य चालू आहे काय ते लिहा.

१३) पक्का माल पुरवठा करण्याच्या आदेशांची अंमलबजावणी त्वरित होते काय ?

१४) संस्था उत्पादनासाठी मंजुरी देते किंवा कच्च्या मालाची विक्री आणि पक्क्या मालाची खरेदी अशी पद्धत अनुसरते ?

१५) मजुरी नोंदवही आणि त्यात दाखविलेल्या कपाती रोजकीर्दिशी तपासा. काही दोष असल्यास नमूद करा.

१६) संस्थेची सांपत्तिक परिस्थिती, पक्क्या मालाच्या विक्रीबाबत बाजारातील परिस्थिती आणि बाहेर चालू असलेले मजुरीचे दर यांच्या संदर्भात संस्थेने ठरविलेले मजुरीचे दर हे वाजवी आहेत काय ?

१७) विक्री दर ठरविण्यासाठी खर्च विभागणीचे (कास्टिंगचे) कागदपत्र ठेवले आहेत काय ? व्यवस्थापन समिती / संचालक मंडळ यांनी ठरविलेल्या धोरणानुसार किंमती ठरविल्या जातात काय ?

**७. विक्री :—**

१) खालील शिर्षकाखाली विक्रीचे वर्गीकरण करा—

(अ) संयुक्त संस्था अगर प्रादेशिक मंडळ यामार्फत करण्यात आलेली विक्री.

(ब) व्यापाऱ्यांना केलेली विक्री.

(क) अडत्यांना आणि कन्साईनमेंट पद्धतीवर केलेली विक्री.

(ड) सहकारी संस्थांना केलेल्या विक्री.

(इ) किरकोळ विक्री.

२) मालाची उधार विक्री होते काय ? अशी उधार विक्री पोटनियमानुसार अधिकृत आहे काय ?

३) मालाची विक्री कमी दराने केलेल्या बाबतीत पोटनियमात दर्शविल्याप्रमाणे व्यवस्थापन समिती/संचालक मंडळ वा साधारण सभा यानी त्यांना सम्मती दिली आहे काय ते लिहा.

४) अंतर्गत तपासणी पुरेशी आणि समाधानकारक आहे काय ?

५) संस्थेकडे कन्साइनमेंट पद्धतीवर माल येतो काय ? असल्यास, तपशील द्या.

८. **व्यापारातील शिल्लक माल :—**

१) शिल्लक मालाच्या नोंदवह्या योग्य प्रकारे ठेवल्या आहेत काय ? त्या अद्यावत लिहिल्या आहेत काय ?

२) साठपाची व्यवस्था समाधानकारक आहे काय ?

३) रुजवातीच्या दिवशी शिल्लक असलेल्या मालाची यादी मिळवून शिल्लक मालाची प्रत्यक्षात रूजवात घ्या आणि शिल्लक मालाच्या नोंदवह्यावर सह्या करा.

४) हिशेब बंद करताना बाजारातील दर किंवा खरेदी दर यातील जे कमी असतील त्या दराप्रमाणे मालाची किंमत केली आहे काय ?

५) आवश्यक तेथे शिल्लक मालाचा विमा उतरविला आहे काय ?

६) रिकाम्या वस्तूंचे कागदपत्र योग्यप्रकारे ठेवले आहेत काय ?

७) शिल्लक मालातील घटी आणि तूटी वाजवी आणि मर्यादित आहेत काय ? संचालक मंडळ / व्यवस्थापन समितीकडून त्या सम्मत झाल्या आहेत काय ?

८) मालाची नियतकालिक तपासणी करण्याची अंतर्गत व्यवस्था समाधानकारक आहे काय ?

९) काही अविक्रेय माल शिल्लक आहे काय ? असल्यास, त्याची विल्हेवाट करण्यावि यी संस्थेने काय कारवाई केली आहे ते लिहा. अशा शिल्लक मालात गुंतलेली एकूण रक्कम लिहा.

९. **खर्च :—**

१) संचालक मंडळ / व्यवस्थापन समिती यांच्या सम्मती-साठी खर्चांची पत्रके ठेवली जातात काय ?

२) आय–व्ययाची वार्षिक अंदाजपत्रके तयार करून त्यास व्यवस्थापन समिती आणि साधारण सभा यांची मान्यता घेण्यांत येते काय ?

३) झालेला सर्व खर्च अंदाजपत्रकाच्या मर्यादित आहे काय?

४) नसल्यास, पुर्नविनियोजनाला (रिॲप्रोप्रिएशन) नंतरच्या साधारण सभेत सम्मती घेतली आहे काय ?

५) संस्थेशी संबंध नसलेल्या खर्चाच्या प्रकरणांची सर्वसाधारण अभिप्रायात नोंद करा.

१०. कर्मचारी वर्ग :--

१) कर्मचारी वर्गाच्या नेमणुकीस आवश्यक तेथे सक्षम प्राधिकाऱ्याची सम्मती घेतली आहे काय ?

२) कर्मचारी वर्गासाठी सेवानियम आणि रजेचे नियम तयार केले आहेत काय ? ते सक्षम प्राधिकाऱ्याने सम्मत केले आहेत काय ?

लेखापरीक्षा अधिकाऱ्याची सही व पदनाम.